# मुख्य कार्यालय, विरार
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**


**जावक क्र. : व.वि.श.म.**/ /
दि.२८/०५/२०२६

*प्रभाग समिती ‘जी’ अंतर्गत अनधिकृत बांधकामावर कारवाई*

मा.आयुक्त व मा.अतिरिक्त आयुक्त यांच्या निर्देशानुसार दिनांक २६ व २७ मे २०२६ रोजी वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ‘जी’ वालीव अंतर्गत एकूण १८४०० चौ.फुटाचे अनधिकृत बांधकाम निष्कासीत करण्यात आले.

दिनांक २६/०५/२०२६ व २७/०५/२०२६ रोजी प्रभाग समिती “जी“ वालीव अतंर्गत बापाणे एस.एम.के इंडस्ट्री येथे ५७५० चौ.फुटाचे ३ पोटमाल्याचे अनधिकृत बांधकाम निष्काशीत करण्यात आले. तसेच कामण ए १ इंडस्ट्री येथे ९४०० चौ.फुटाचे १ अनधिकृत लोखंडी पत्राशेडचे बांधकाम, कामण गाव नाका येथे २५० चौ.फुटाच्या एका रुमचे अनधिकृत बांधकाम निष्काशीत करण्यात आले. त्याचप्रमाणे देवदळ सागपाडा इडी इंडस्ट्री मागे ५०० चौ.फुटाच्या २ रुमचे अनधिकृत बांधकाम निष्काशीत करण्यात आले. वालीव येथील अप्पा मैदान येथे २५०० चौ.फुटाचे एक बांबुशेडचे अनधिकृत बांधकाम निष्काशीत करण्यात आले व एक अनधिकृत शेड तोडण्यात आले. तसेच फादरवाडी रेल्वे ब्रिज खाली अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात आली.

सदर मोहीमेत *एकूण -१८,४०० चौ.फुट* अनधिकृत बांधकाम निष्कासन करणेत आले.

या कारवाईवेळी प्रभाग समिती ‘जी’ वालीव विभागाचे सहाय्यक आयुक्त श्री.निलेश म्हात्रे, अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.मनोज घरत, क.अभियंता श्री.मयुरेश पाटील तसेच मजूर कर्मचारी उपस्थित होते.